सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २३३ | शनिवार, दि. १६ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

# 'स्वराज्य रक्षक छत्रपती शंभू राजे' महानाट्य

## २५० कलाकारांनी जिवंत केला इतिहास,जयनिल फाऊंडेशनचा थाटात शुभारंभ




*अमळनेर : स्वराज्य रक्षक छत्रपती शंभूराजे या भव्य महानाट्याच्या मंचावर उपस्थित संतश्री प्रसाद महाराज, खासदार स्मितताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, नगरसेविका जयश्रीताई पाटील, राजश्रीताई पाटील व दुसऱ्या छायाचित्रात महानाट्यातील एक क्षण.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त अमळनेर येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात काल "स्वराज्य रक्षक छत्रपती शंभू राजे" या भव्य महानाट्याचे दिमाखात सादरीकरण झाले. संस्कृती फाऊंडेशन व जयनिल फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महानाट्याचे दोन्ही प्रयोग प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात पार पडले.

जयनिल फाऊंडेशनच्या वतीने सकाळी १० वाजता महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी स्वतंत्र प्रयोग आयोजित करण्यात आला होता.यावेळी प. पु. संत प्रसाद महाराज यांच्या शुभ हस्ते जयनिल फाऊंडेशनचे लोगो अनावरण करून शुभारंभ करण्यात आला.यावेळी अध्यक्षस्थानी खासदार स्मितताई वाघ व प्रमुख उपस्थिती माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.परीक्षित बाविस्कर,माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई अनिलदादा पाटील, लोकनियुक्त सरपंच श्रीमती राजश्रीताई राजेश पाटील, खा. शि. मंडळाचे कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन,प्रांताधिकारी मयूर भंगाळे, पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम, जितेंद्र ठाकुर,जयनिल फाऊंडेशनचे अध्यक्ष गौतम अनिलदादा पाटील, उपाध्यक्ष वरूण राजश्रीताई पाटील उपस्थित होते. यावेळी संतश्री प्रसाद महाराजांनी आशिर्वचन दिले तर आमदार अनिलदादा पाटील व खासदार स्मितताई वाघ यांनी शुभेच्छा दिल्या.

तर संस्कृती फाऊंडेशनचे निकेश राजपुत यांनी हा कार्यक्रम घेण्यासाठी बळ दिल्याबद्दल आमदार अनिलदादा पाटील आणि जयनिल फाऊंडेशनचे आभार व्यक्त केले.

### २५० कलाकारांनी जिवंत केला इतिहास

या महानाट्यात सुमारे २५० कलाकारांनी भूमिका साकारल्या. विशेष म्हणजे यातील ८० टयांपेक्षा अधिक कलाकार अमळनेरचे होते. "ज्या कलाकारांना व्यासपीठ मिळत नाही, त्यांना संधी देण्याचा प्रयत्न संस्कृती फाऊंडेशनने केला,"सर्वांनी उत्कृष्ठ भूमिका साकारल्या, कथानकही सुंदर होते,अनेक क्षण अंगावर शहारे आणत होते.या महानाट्यामुळे लाईव्ह इतिहास प्रेक्षकांसमोर उभा राहिला,छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराजांच्या घोषणांनी सभागृह दणाणले होते.संभाजी महाराजांच्या अखेरच्या क्षणाने साऱ्यांचे डोळे पाणावले होते.शेवटी संभाजी महाराजांची भूमिका साकारणाऱ्या कलावंतांसमोर अनेक जण नतमस्तक होऊन संस्कृती फाऊंडेशन आणि जयनिल फाऊंडेशचे आभार मानत मार्गस्थ झाले.



"छत्रपती संभाजी राजे हे तरुणाईचे आदर्श आहेत, म्हणून खास युवकांसाठी हा प्रयोग ठेवला.आणि याच दिवशी जयनिल फाऊंडेशनचाही शुभारंभ केला. शिक्षण, आरोग्य, शेती, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात काम करून तरुणाईला केंद्रबिंदू मानून फाऊंडेशन काम करेल.

**गौतम पाटील**
अध्यक्ष : जयनिल फाऊंडेशन

# अमळनेर विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम

## बीएलओ करणार घरोघरी पडताळणी ; जूनपासून प्रक्रिया सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये व ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला असून महाराष्ट्राचाही त्यात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अमळनेर विधानसभा मतदारसंघातही मतदार याद्यांचे विशेष पुनरिक्षण करण्यात येणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांनी दिली.

या मोहिमेंतर्गत मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार असून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ ) यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहितीची खातरजमा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी विविध राजकीय पक्षांकडून नियुक्त करण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट' (बी एल ए ) देखील सहकार्य करणार आहेत. सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामाचा विचार करून या पुनरिक्षण मोहिमेचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. जून महिन्यापासून ही प्रक्रिया सुरू होणार असून ऑक्टोबर २०२६ मध्ये अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.



### महत्त्वाचे वेळापत्रक

२० ते २९ जून २०२६ दरम्यान बीएलओंना प्रशिक्षण व पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी भेटी देऊन माहिती संकलन केले जाईल. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध होईल. तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### राजकीय पक्षांनाही आवाहन

भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले बीएलए नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतील दुबार नावे, मृत व्यक्तींची नावे वगळणे तसेच नव्या पात्र मतदारांची नोंदणी अधिक अचूक व पारदर्शक पद्धतीने होण्यास मदत होणार असल्याचे उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांनी सांगितले.

# चिन्मय हॉटेलला आग; १६ बिघेतील चारा खाक

## कडक उन्हातही आग विझवण्यासाठी अग्निशमन कर्मचाऱ्यांची धडपड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहराबाहेरील धार मारवड रस्त्यावरील चिन्मय हॉटेलच्या मागील शेतात आग लागल्याने शेतातला काढलेला गहू मका जळून खाक झाला आहे.

१५ रोजी दुपारी दोन ते अडीच वाजेच्या सुमारास अचानक आग लागल्याने चिन्मय हॉटेलला देखील आग लागली. जवळील मोठ्या झाडांना देखील आग लागली होती. हॉटेलची आग विझवण्यात आली. मात्र वारा सुरू असल्याने शेतातील गहू चाऱ्याची आग जोरात पसरत होती. कडक उन्हाने गवत व चारा भुरुभुरू जळत होते. माजी नगरसेवक किरण बागुल , जालिंदर चौधरी , श्याम बागुल यांनी मुख्याधिकारी गणेश शिंदे याना कालवून अग्निशमन बंम्ब मागवले. अग्निशमन दल प्रमुख गणेश गोसावी यांनी तिन्ही बंब तातडीने रवाना केले. दिनेश बिराडे, फारूक शेख , मच्छीन्द्र चौधरी, आकाश संदानशिव ,जफर पठाण यांनी आग विझवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. गाड्यांमधील पाणी संपल्यानन्तर पुन्हा भरून आणत घरांकडे पसरत जाणारी आग आटोक्यात आणण्यासाठी पलीकडच्या बाजूने रामवाडी कडून पाणी मारण्यात आले.



*अमळनेर : आग लागलेल्या शेतातील चारा विझवितांना अग्निशामक कर्मचारी*

# वै.गु. मोठेबाबा मंदिरात आदिशक्ती संत मुक्ताई तिरिभूत समाधी सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्रीराम नगरातील वैकुंठवासी गुरुवर्य मोठेबाबा स्मृती मंदिरात सालाबाद प्रमाणे संत मुक्ताबाई यांचा ७२९ वा चतुर्भुज समाधी सोहळा वैशाख व दशमी दि. १२ मे रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याच्या निमित्ताने ह.भ.प. गुलाबराव महाराज लोणकर यांच्या सुश्राव्य कीर्तन श्रवणाचा लाभ भाविकांनी घेतला.

या विशेष प्रसंगी थाळनेर येथील श्री काशिनाथ बाबुलाल ठाकरे व सौ लताबाई काशिनाथ ठाकरे या दांपत्याने अतिशय खडतर व अध्यात्मात पुण्यपावन असणारी नर्मदा परिक्रमा अनवाणी पायाने तीन वर्ष तीन महिने १३ दिवसात संकल्पपूर्ती केल्याबद्दल त्यांचे स्नेही श्री यशवंतराव बोरसे व सौ. संध्या बोरसे ( वेळोदे )यांच्यावतीने तसेच वैकुंठवासी गुरुवर्य मोठेबाबा

पान २ वर



*अमळनेर : संत मुक्ताबाई यांचा ७२९ वा चतुर्भुज समाधी सोहळ्यात किर्तन सादर करताना ह. भ. प. गुलाबराव महाराज लोणकर सोबत सहकारी.*

# गंधमुक्तीला शवपेटीचे दान; वडिलांच्या संस्कारातून तीन भावांची समाजसेवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमलेश्वर नगर भागातील रहिवासी तथा सेवा निवृत्त शिक्षक कै. पंडित बाबुलाल भोई (शिंगाणे) यांचे गंभीर आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली असून हसतमुख, प्रेमळ आणि माणुसकी जपणारा माणूस हरपल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

साधी राहणी, प्रेमळ स्वभाव, प्रत्येकावर निरपेक्ष प्रेम आणि समाजाशी घट्ट नाळ जोडणारे व्यक्तिमत्त्व म्हणून पंडित भोई यांची ओळख होती. त्यांच्या अचानक जाण्याने शिंगाणे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. मात्र, वडिलांचे संस्कार आणि समाजसेवेची परंपरा जिवंत ठेवत त्यांच्या तिन्ही मुलांनी समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा अनोखा उपक्रम राबवला.

गंधमुक्ती व उत्तरकार्याच्या दिवशी सामाजिक कार्यकर्ते मनोज शिंगाणे, नितीन शिंगाणे आणि डॉ. सुनील शिंगाणे यांनी भोई समाज बांधवांच्या सेवेसाठी शवपेटी भेट देत वडिलांना अनोखी श्रद्धांजली अर्पण केली.

मनोज शिंगाणे यांनी रक्तदानाच्या माध्यमातून हजारो रुग्णांना मदतीचा हात दिला आहे, तर डॉ. सुनील शिंगाणे यांनी कोरोना काळात रुग्णसेवेत महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. भविष्यातही शक्य तेवढी आरोग्य सेवा व समाजसेवा सुरू ठेवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पांडुरंग शिंगाणे (मेंबर), भागवत महाजन (उपकार्यकारी अभियंता), रणजित शिंदे, सुभाष लंबोळे, नितू भोई, प्रवीण पाटील, नारायण भोई, सामाजिक कार्यकर्ते सुनील भोई, महावीर पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन संजय भोई, सामाजिक कार्यकर्ते बापू भोई, पोलीस हेड कॉन्स्टेबल विजय भोई, संजय साटोटे सर, भाऊसाहेब शिंगाणे, रमेश भोई, पांडुरंग महाजन, कुणाल शिंगाणे, पंकज भोई, दिपक शिंगाणे, सुनील भोई, मोहन भोई, कैलास बेंद्रे, भूषण सुतार, प्रवीण भोई, हिरालाल शिवदे व हिरालाल शिंगाणे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




आजचे अभीष्टचिंतन





श्री. वाल्मिक पाटील
शिक्षक, अमळनेर



श्री. अभी महाजन
अमळनेर



श्री. अभिषेक महाजन
(विक्की) अमळनेर



श्री. अमोल राणे
राणे झेरॉक्स



श्री. दिनेशदादा नाईक
सिनेट सदस्य, कबचौ उमवि, जळगाव

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

**विक्की कौशल : अभिनयाचा 'मसान' ते भारतीय सिनेसृष्टीचा 'सॅम बहादूर'**

- पान २ वर

## संपादकीय

# भविष्यातील डॉक्टरांचा प्रश्न

भारतातील वैद्यकीय शिक्षणाचे प्रवेशद्वार मानली जाणारी 'नीट' परीक्षा सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ज्या देशात डॉक्टरला देवाचा दर्जा दिला जातो, त्या देशातील डॉक्टरांच्या निवडीची प्रक्रियाच संशयाच्या जाळ्यात अडकणे, ही अत्यंत चिंतेची बाब आहे. लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य आणि देशाच्या आरोग्य व्यवस्थेचा पाया या परीक्षेवर अवलंबून असताना, सध्या निर्माण झालेला गोंधळ केवळ तांत्रिक बिघाड नसून प्रशासकीय नैतिकतेचे अध:पतन आहे. यावर्षीच्या 'नीट' परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. इतिहासात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना पूर्ण गुण (७२० पैकी ७२०) मिळाले. एकाच परीक्षा केंद्रावरील अनेक विद्यार्थी टॉपर असणे आणि ज्यांना गेल्या वर्षीपर्यंत साधे उत्तीर्ण होणे कठीण होते, त्यांना ग्रेस मार्क्सच्या जोरावर अवास्तव गुण मिळणे, या सर्व गोष्टी संशयास्पद आहेत.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिलेले 'ग्रेस मार्क्स' (सवलतीचे गुण) हे वादाचे मुख्य कारण ठरले. वेळेचा अपव्यय झाला म्हणून गुण बहाल करण्याचा निर्णय घेताना कोणती नियमावली वापरली गेली, हे स्पष्ट करण्यात यंत्रणेला अपयश आले. जेव्हा सर्वोच्च न्यायालयाला यात हस्तक्षेप करावा लागतो, तेव्हाच समजते की परीक्षा घेणारी यंत्रणा पारदर्शकता राखण्यात अपयशी ठरली आहे.देशाच्या विविध भागांतून पेपरफुटीच्या बातम्या समोर आल्या आहेत. काही राज्यांमध्ये झालेली अटक आणि जप्त केलेली कागदपत्रे हे सिद्ध करतात की, 'परीक्षा माफिया' अजूनही यंत्रणेमध्ये शिरकाव करून आहेत. डिजिटल युगातही जर प्रश्नपत्रिका सुरक्षित राहू शकत नसतील, तर लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे मूल्य काय? रात्रीचा दिवस करून अभ्यास करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्याचा विश्वास जेव्हा व्यवस्थेवरून उडतो, तेव्हा तो केवळ एका परीक्षेचा पराभव नसून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा पराभव असतो.

'नीट' परीक्षेच्या भोवती उभ्या राहिलेल्या हजारो कोटींच्या कोचिंग उद्योगानेही या समस्येत भर घातली आहे. शिक्षण ही आता सेवा राहिलेली नसून ती एक व्यावसायिक स्पर्धा बनली आहे. मोठ्या शहरांमधील नामवंत कोचिंग क्लासेस आणि परीक्षा घेणारी यंत्रणा यांच्यातील साटलोटं असल्याच्या चर्चा जेव्हा दबक्या आवाजात सुरू होतात, तेव्हा सामान्य घरातील हुशार विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर होतो. श्रीमंत पालकांची मुले पैसे देऊन जागा लाटत असतील, तर गुणवत्तेला काही अर्थ उरतो का? हा खरा प्रश्न आहे. निकालांमधील गोंधळानंतर सर्वोच्च न्यायालयाने "परीक्षेची पवित्रता धोक्यात आली आहे" असे जे निरीक्षण नोंदवले, ते अत्यंत गंभीर आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, जर परीक्षेच्या प्रक्रियेत ०.००१% जरी निष्काळजीपणा झाला असेल, तर तो गांभीर्याने घ्यायला हवा. यंत्रणेने आपली चूक मान्य करण्याऐवजी ती लपवण्याचा प्रयत्न करणे हे लोकशाहीला घातक आहे. ग्रेस मार्क्स रद्द करण्याचा निर्णय हा विद्यार्थ्यांच्या लढ्याचा पहिला विजय असला, तरी संपूर्ण चौकशीशिवाय हा कलंक पुसला जाणार नाही.केवळ चौकशी समित्या नेमून किंवा काही विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेऊन हा प्रश्न सुटणारा नाही. व्यवस्थेतील मूळ दोष दूर करण्यासाठी खालील पावले उचलणे गरजेचे आहे.पेपरफुटी किंवा परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्यांसाठी फाशीसारखी किंवा जन्मठेपेसारखी कठोर शिक्षा देणारा कायदा हवा.'एक देश, एक परीक्षा' हे तत्त्व ऐकायला चांगले वाटत असले, तरी भारतासारख्या अवाढव्य देशात सर्व भार एकाच यंत्रणेवर टाकणे जोखमीचे ठरत आहे का, याचा विचार व्हायला हवा.प्रश्नपत्रिकांची छपाई, वाहतूक आणि वितरण यामध्ये मानवी हस्तक्षेप किमान करून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अनिवार्य आहे.महाराष्ट्र, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल यांसारख्या राज्यांनी 'नीट'च्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षण विभागाने ज्या पद्धतीने आक्षेप नोंदवले आहेत, त्यावरून हे स्पष्ट होते की केंद्र आणि राज्यांमध्ये समन्वय अभाव आहे. तामिळनाडूने तर 'नीट'मधून कायमस्वरूपी मुक्ती देण्याची मागणी केली आहे. शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय असल्याने, राज्यांच्या अधिकारांवर गदा न आणता स्थानिक विद्यार्थ्यांच्या हिताचे रक्षण करणे केंद्र सरकारचे कर्तव्य आहे.एनटीए सारख्या संस्थांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी तत्पर असायला हवे, न की केवळ स्पष्टीकरणे देऊन वेळ मारून नेण्यासाठी.वैद्यकीय क्षेत्र हे मानवी जीवनाशी निगडित आहे. जर भ्रष्टाचाराच्या वाटेने गेलेले विद्यार्थी उद्याचे डॉक्टर बनले, तर ते समाजासाठी किती घातक ठरतील, याची कल्पनाही करवत नाही. सरकार आणि न्यायव्यवस्थेने केवळ कागदोपत्री कारवाई न करता, गुणवत्तेचा आदर होईल अशी चोख व्यवस्था निर्माण करावी. लाखो तरुणांच्या डोळ्यांतील स्वप्ने व्यवस्थेच्या भ्रष्टाचारामुळे काळवंडू नयेत, हीच काळाची गरज आहे. 'नीट' ची शुद्धता हा केवळ परीक्षेचा विषय नसून तो या देशाच्या भविष्यातील आरोग्याचा विषय आहे.

# वै.गु. मोठेबाबा मंदिरात आदिशक्ती संत मुक्ताई तिरिभूत समाधी सोहळा

पान १ वरून

स्मृती मंदिर ट्रस्ट, व देवगाव (पारोळा )व वेळोदे येथील भजनी मंडळाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. उपस्थित भाविकांना आमरस व पुरणपोळीचा महाप्रसाद भोजन दिले गेले. संत मुक्ताबाई अंतर्धान – तिरिभूत समाधी सोहळा किर्तन सेवेसाठी सालाबादाप्रमाणे वै.ह.भ.प. दिवाकर राहणे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ह.भ.प श्री उमेश रहाणे व राहणे परिवार यांनी किर्तन सेवेचे यजमानपद स्विकारले. याप्रसंगी हभप सत्यवान महाराज (देवगाव ), हभप प्रकाश महाराज, अमळनेर ). हभप अरुण महाराज ( रडावण ) हभप राजू महाराज, भगवान महाराज यांच्या हस्ते देणगीदारांचा व गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमासाठी मंदिर संस्थेचे उपाध्यक्ष श्री वडील साहेब विश्वस्त जे.बी आप्पा पाटील, बोरसे नाना, शिंदे नाना, मधुकर पवार,सचिव शिंदे रावसाहेब,श्री सोनवणे भाऊसाहेब,श्री ज्ञानेश्वर पाटील यांनी सहकार्य केले.भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन श्रवणाचा लाभ घेतला.

# विक्की कौशल : अभिनयाचा 'मसान' ते भारतीय सिनेसृष्टीचा 'सॅम बहादूर'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय चित्रपटसृष्टीत स्वत:च्या हिमतीवर आणि कसदार अभिनयाने स्थान निर्माण करणाऱ्या मोजक्या अभिनेत्यांमध्ये विक्की कौशल हे नाव आज अग्रक्रमाने घेतले जाते. १६ मे हा या हरहुन्नरी अभिनेत्याचा जन्मदिन.




विक्की कौशल यांचा जन्म १६ मे १९८८ रोजी मुंबईतील एका चाळीत झाला. त्यांचे वडील शाम कौशल हे बॉलिवूडमधील प्रसिद्ध स्टंट दिग्दर्शक आणि ॲक्शन डायरेक्टर आहेत. चित्रपट पार्श्वभूमी असली तरी विक्की यांचे बालपण सर्वसामान्य मुलाप्रमाणेच गेले. त्यांनी राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकॉम इंजिनिअरिंगची पदवी पूर्ण केली. नोकरीची संधी असतानाही, कॅमेऱ्याच्या मागे राहण्यापेक्षा कॅमेऱ्यासमोर काम करण्याची ओढ त्यांना अभिनयाकडे घेऊन आली.

अभिनयाची आवड जोपासण्यासाठी त्यांनी किशोर नमित कपूर यांच्या अकादमीत प्रशिक्षण घेतले आणि सुरुवातीला अनुराग कश्यप यांच्याकडे 'गँग्स ऑफ वासेपूर' चित्रपटासाठी साहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले. २०१५ मध्ये आलेल्या 'मसान' चित्रपटाने त्यांचे नशीब बदलले. या चित्रपटातील 'दीपक' ही भूमिका त्यांनी इतक्या जिवंतपणे साकारली की, प्रेक्षक आणि समीक्षक दोघेही थक्क झाले.विक्की



कौशल यांनी कधीही स्वत:ला एका विशिष्ट साच्यात अडकून दिले नाही. त्यांच्या कारकिर्दीतील काही मैलाचे दगड ठरलेले चित्रपट उरी : द सर्जिकल स्ट्राइक या चित्रपटाने त्यांना घराघरात पोहोचवले.हाऊज् द जोश? हा संवाद आजही तरुणांच्या ओठावर आहे. या भूमिकेसाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला.सरदार उधम क्रांतीकारक उधम सिंग यांच्या भूमिकेत त्यांनी जो संयत अभिनय केला, त्याचे जगभरात कौतुक झाले.संजू या चित्रपटात रणबीर कपूरसोबत काम करतानाही 'कमली' या भूमिकेतून त्यांनी स्वत:ची वेगळी छाप पाडली.

सॅम बहादूर भारताचे पहिले फिल्ड मार्शल सॅम माणेकशा यांची भूमिका साकारून त्यांनी आपल्या अभिनयाची उंची पुन्हा एकदा सिद्ध केली.विक्की कौशल हे त्यांच्या नम्र स्वभावासाठी ओळखले जातात. डिसेंबर २०२१ मध्ये त्यांनी प्रसिद्ध अभिनेत्री कतरिना कैफ यांच्याशी विवाह केला. ही जोडी बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय आणि लाडक्या जोड्यांपैकी एक मानली जाते.

इंजिनिअरिंग सोडून शून्यातून विश्व निर्माण करणारा हा अभिनेता आजच्या तरुणाईसाठी एक मोठी प्रेरणा आहे. चॉकलेटी हिरोच्या इमेजमध्ये न अडकता, रांगड्या फौजीपासून ते मध्यमवर्गीय तरुणापर्यंतच्या सर्व भूमिका त्यांनी लीलया पेलल्या आहेत.स्टारडम असूनही विक्की आजही आपल्या मुळांशी जोडलेले आहेत.अभिनयासोबतच विक्की त्यांच्या डान्स स्टेप्ससाठी (विशेषत: पंजाबी गाण्यांवरील डान्स) सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असतात.प्रत्येक भूमिकेसाठी ते शारीरिक आणि मानसिक स्तरावर प्रचंड मेहनत घेतात.आज १६ मे २०२६, विक्की कौशल यांचा वाढदिवस. योगायोगाने आज शनी जयंती आणि शनी अमावस्या देखील आहे. अशा शुभ दिनी जन्माला आलेल्या या महान कलाकाराला पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!

# पैलाडचा जुना वाद यात्रेत पेटला; दोन्ही गटांतील ११ जणांवर गुन्हे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खुन्नस देण्यावरून जुना वाद उकरून पैलाड येथील दोन गटात संत सखाराम महाराज यात्रेत हाणामारी होऊन तीन जण जखमी झाल्याची घटना दि.११ रोजी रात्री बोरी नदी पात्रात घडली. दोन्ही गटातील ११ जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन तीन दिवसांपूर्वी ज्ञानेश्वर जयदेव पाटील व योगेश गोविंदा धनगर रा. पैलाड व निखिल पाटील पैलाड यांच्यात खुन्नस देण्यावरून वाद झाले होते. काहींच्या मध्यस्थीने वाद मिटवण्यात आले. दि. ११ रोजी यात्रेत ड्रॅगन पाळण्या समोरून जात असताना निखिल, मयूर आणि गणेश यांनी त्यांच्या अंगावर धावून शिवीगाळ केली आणि निखिलने चाकूने ज्ञानेश्वरच्या पोटात मारायला गेला तो योगेशने हातावर झेलला. तेव्हा गणेश आणि खुशाल यांनी त्याला पकडून लाथाबुयांनी मारहाण केली. आणि मयूरने ज्ञानेश्वराला मागून पकडून



ठेवले निखिलने ज्ञानेश्वरच्या गालावर चाकूने वार केला. होमगार्ड आल्यानन्तर सर्व पळून गेले. जखमींनी दवाखाण्यात उपचार घेतले असून जबाबवरून योगेश गोविंदा धनगर याने फिर्याद दिल्यावरून निखिल सुरेश पाटील, मयूर सुरेश पाटील, गणेश रमेश पाटील, खुशाल रामदास पाटील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड करीत आहेत.

निखिल याच्या फिर्यादीवरून, यात्रेत फिरत असताना योगेश गोविंद कंखरे, ज्ञानेश्वर जयदेव पाटील, अक्षय विजय पाटील, दीपक बापूजी कंखरे, कुंदन पाटील, मुकेश धनगर, गोलू धनगर यांच्या जवळ लाकडी दांडके, लोखंडी रॉड होते. योगेश यांच्याकडे चाकू होता. सर्व जण वादावरून शिवीगाळ करू लागले. योगेशने हातातील चाकूने छातीवर वार केला तो हातावर झेलला. आणि ज्ञानेश्वरने हातातील लोखंडी रॉडने डोक्यावार केला. तोही हाताने झेलल्याने हाताचे बोट फ्रक्चर होऊन उजव्या अंगठ्याजवळील नस कापली गेली. नंतर पोलीस आल्याने सर्व जण शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी देऊन पळून गेले. दवाखान्यात उपचार घेतल्यानंतर जबाब देऊन निखिलच्या फिर्यादीवरून सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड करीत आहे.

# वेटरच्या खूनप्रकरणी हॉटेल मालक निर्दोष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : वेटरचा खून करून पुरावे नष्ट करण्याच्या आरोपातून साई रुपाली हॉटेलचे मालक नरेंद्र चौधरी यांची जिल्हा सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. २२ एप्रिल २०२३ रोजी साई रुपाली हॉटेलचा वेटर दगडू नारायण पाटील हा सकाळी ६ वाजता हॉटेलच्या बाहेर जखमी अवस्थेत आढळून आला होता. त्याला धुळे येथे जिल्हा सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला उपचारासाठी गुजरातमध्ये सुरत येथे नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले होते.

६ मे रोजी त्याचा मृत्यू झाल्याची नोंद गुजरात मध्ये खटोदरा पोलीस स्टेशनला करण्यात आली होती. त्यांनतर चौकशी नंतर तीन महिन्यानी २१ जुलै २०२३ ला हॉटेल मालक नरेंद्र यशवंत चौधरी याच्या विरुद्ध खून करणे आणि पुरावे नष्ट केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. २९ जुलै २०२३ ला नरेंद्र चौधरी याला अटक करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने जामीन नाकरल्याने तेव्हापासून तो कारागृहात होता. हा खटला अमळनेर येथील सत्र न्यायालयात सुरू होता. न्या. एल.डी. गायकवाड यांनी १५ साक्षीदार तपासले. आरोपी नरेंद्र चौधरी यांच्यातर्फे ॲड. शामकांत पाटील यांनी युक्तिवाद केला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर नरेंद्र चौधरी याची खुनातून निर्दोष मुक्तता केली आहे.

# चहा सोडला तर खरेच वजन घटते का?

## जाणून घ्या चहाचा त्याग आणि वेट लॉसचे नेमके कनेक्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील अनेकांची आनंदी आणि उत्साही सकाळ चहा प्यायल्यानंतर सुरू होते. त्यामुळे फार पूर्वीपासून चहा आणि भारतीयांचे एक अनोखे नाते निर्माण झाले आहे. परंतु, चहामुळे वजन वाढते असे अनेकदा म्हटले जाते.

त्यामुळे जेव्हा कधी वजन कमी करण्याचा विचार येतो, तेव्हा बरेच जण पारंपरिक दुधाचा चहा बंद करतात. पण, खरेच वजन कमी करताना चहा पिण्याची सवय बंद करणे गरजेचे असते का? याविषयी हेल्थ इन्फ्लुएंसर यांच्या मते गाय, म्हैस या जनावरांच्या १०० मिली दुधात सुमारे ५०-६० किलोकॅलरी असते, तर एक चमचा साखरेत (४.३ ग्रॅम) १६ किलोकॅलरी असते. याचा अर्थ एक कप चहामध्ये अंदाजे १००-११० किलोकॅलरी असते. यामुळे फॅट कसे कमी होणार?

तुम्ही चहामध्ये अनावश्यक पांढरी साखर तर टाकताच, शिवाय त्याबरोबर रस्क, बिस्किटे, खारी, पकोडे यांसारखे स्नॅक्स खाता.याचा अर्थ, तुमचा दैनंदिन कॅलरी भत्ता आणि तुमच्या आरोग्याच्या समस्यांच्या आधारे दिवसभरात दोन लहान कप चहा पिणे पूर्णपणे स्वीकार्य आहे, पण यात कॅफीनचे प्रमाण कमी असले पाहिजे.

तुम्ही चहाच्या कपमध्ये अनावश्यक साखर/गूळ घालणे टाळा. त्याऐवजी स्टीव्हिया किंवा मोंक फ्रूट सारखे ० किलोकॅलरी गोड पदार्थ घ्या.तुम्हाला चिंता, हाय कॉर्टिसोल, हाय ब्लड शुगर आणि हायपर ॲसिडिटीचा त्रास असल्यास एक कपपेक्षा जास्त चहा पिऊ नका.

अहमदाबादमधील मुख्य आहारतज्ज्ञ यांच्या मते, जर कोणी वजन कमी करण्याचा विचार करत असेल तर नेहमी चहाचे सेवन कमी करण्याची शिफारस केली जाते. कारण त्यात कॅलरीज असतात, टॅनिन असते जे लोह आणि काही खनिजांच्या शोषणात अडथळा निर्माण करतात.मुख्य जेवणासह चहा पिणे टाळले पाहिजे. जेवण्यापूर्वी आणि जेवणानंतर एक ते दोन तासांचे अंतर राखल्यानंतरच चहा घ्या. जर एका दिवसात तुम्ही दुधाच्या चहाचे सेवन जास्त प्रमाणात करत असाल तर काही कप ग्रीन टी किंवा ब्लॅक टी प्यायली पाहिजे.साखरेचे सेवन मर्यादित करण्याचा सल्ला दिला आहे. गुळ किंवा साखरेमध्ये जवळजवळ समान कॅलरीज असतात, म्हणून त्यांचे सेवन मर्यादित करण्याची शिफारस केली जाते. याऐवजी तुम्ही ब्राऊन शुगर निवडू शकता. साखरेचे प्रमाणात सेवन केल्यास तुम्हाला लालसेवर नियंत्रण ठेवता येते आणि रक्तातील साखरेची पातळीदेखील मर्यादित ठेवता येते, ज्यामुळे अतिरिक्त चरबी कमी करण्यास मदत होते.

याशिवाय संपूर्ण दूध किंवा मलई घालून बनवलेल्या चहामध्ये सॅच्युरेटेड फॅट्स जास्त असू शकतात. त्यामुळे चहाचे सेवन बंद करत तुम्ही तुमच्या आहारातून हे उच्च चरबीयुक्त घटक काढून टाकू शकता, यामुळे वजन कमी करण्यास आणि संपूर्ण हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते.अतिरिक्त कॅलरी न जोडता हायड्रेट राहण्यासाठी चहाच्या जागी तुम्ही पाणी किंवा इतर कमी कॅलरी असलेली पेये निवडू शकता.

# लहान बाळांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाचे मोठे पाऊल विशेष कृती दलची स्थापना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बालमृत्यू रोखण्यासाठी आणि बालकांना गंभीर आजारांपासून संरक्षण देण्यासाठी लसीकरण अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. मात्र, अनेक लसीकरण मोहिमांमध्ये हजारो बालके लसीकरणापासून वंचित राहत आहे. याच पार्श्वभूमीवर सरकारने आता जिल्हा व महानगर पालिकास्तरावर लसीकरण कृती दल स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.



यामार्फत लसीकरणाचा नियमित आढावा, अंमलबजावणी व बालकांपर्यंत सेवा पोहोचविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.बालकांना वेळेत लसीकरण केल्यास अनेक आजारांपासून संरक्षण मिळू शकणार आहे. जिल्ह्यात ३ वर्षांत ६२५ बालमृत्यूंची नोंद,३ वर्षांत जिल्ह्यात ६२५ बालमृत्यूंची नोंद करण्यात आली. यात न्युमोनिया, कमी वजनाचे बाळ, डायरिया अशा अनेक आजारांचा समावेश आहे. अनेक प्रकरणांमध्ये संसर्गजन्य आजार कारणीभूत असून ग्रामीण आणि दुर्गम भागांत लसीकरणाचा कमी टक्का हेही कारणीभूत आहे.लसीकरण मोहिमांमधील त्रुटी दूर करण्यासाठी पुढाकार, वंचित बालकांचा शोध घेण्यासाठी विशेष यंत्रणा, जिल्ह्यात नियमित आढावा बैठक घेतली जाणार आहे. लसींचा पुरवठा, साठवण आणि वितरणावर लक्ष, महानगरपालिका क्षेत्रात स्वतंत्र समन्वयक, राज्य, जिल्हा आणि महापालिका स्तर, राज्यस्तर लसीकरण मोहिमेचे निरीक्षण, जिल्हास्तर, जिल्हाधिकारी व आरोग्य अधिकाऱ्यांचा समन्वय साधून वंचित बालकांची माहिती संकलन केली जाणार आहे.

जन्मानंतर बीसीजी, ओपीव्ही, हिपॅटायटिस-बी, ६ आठवडे नंतर पेंटाव्हॅलेंट, पोलिओ, रोटा व्हायरस, १० आठवडे दुसरा डोस,१४ आठवडे तिसरा डोस ,९ ते १२ महिने गोवर-रुबेला, १६ ते २४ महिने बूस्टर डोस , ५ वर्षे डीपीटी बूस्टर बालमृत्यूसह

**या आजारांना अटकाव...**

गोवर, पोलिओ, क्षयरोग, डिप्थेरिया, धनुर्वात, हिपॅटायटिस-बी, रुबेला, न्युमोनिया, अतिसारजन्य गंभीर संसर्ग अशा आजारांचे लसीकरण केल्यास बाल मृत्यूचे प्रमाण कमी होणार आहे.एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी राज्यभर विशेष कृती दल कार्यरत केले जाणार आहे.

प्रत्येक तालुक्यात नियमित आढावा घेऊन लसीकरण मोहीम अधिक प्रभावी करण्यात येतील.डॉ. सचिन भायकर, जिल्हा आरोग्य अधिकारी जळगाव.बालकांना लसीकरण गरजेचेजन्मानंतरच्या पहिल्या काही वर्षांत बालकांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असते. लसीकरणामुळे गंभीर संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळते.बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी नियमित लसीकरण प्रभावी उपाय मानला जातो. लसीकरणामुळे भविष्यातील आरोग्य खर्चातही बचत होते.प्रत्येक बालकापर्यंत लस पोहोचवणे हे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# मयतांच्या नावावर धान्य घोटाळा; दोन रेशन दुकानदारांवर गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मयत सभासदांच्या नावे धान्य उचलून २०१२ ते २०१६ दरम्यान सुमारे ९ लाख ६२ हजार २०८ रुपये किमतीच्या गहू तांदुळाचा अपहार केला म्हणून उच्च न्यायालयाच्या आदेशाने तालुक्यातील दहिवद येथील दोन रेशन दुकांदारांनविरुद्ध जीवनावश्यक वस्तू सेवा कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

दहिवद येथील रमेश पाटील दुकान क्रमांक १४५ मध्ये २०१२-२०१६ दरम्यान अंत्योदय लाभार्थी सुमनबाई मच्छीन्द्र पाटील, गुणवंताबाई आत्माराम माळी, सोनाबाई देवचंद माळी या मयत लाभार्थ्यांच्या नावे अंत्योदय व बीपीएल धान्य योजनेतून धान्य उचलून अपहार केला. याबाबत श्यामकांत जयवंतराव पाटील यांनी तक्रारी करून पुरावे दाखल केले होते. दुकानांचे परवाने रद्द झाले.

त्यांनतर गुन्हे दाखल होण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या आदेशाने अमळनेर पोलीस स्टेशनला पुरवठा निरीक्षण अधिकारी रुकसाना जमाल शेख यांनी फिर्याद दिल्यावरून भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१६(४), ३१८(५), ३३६ (२), ३३६ (३), ३४० (२) तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा




दाखल करण्यात आला असून तपास पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर करीत आहेत. रमेश पाटील यांनी अंत्योदय योजनेचे ८५ हजार ३३४ रुपयांचे २२४० किलो गहू तांदूळ, बीपीएल योजनेचे ३ लाख ६६ हजार ४१२ रुपयांचे ९ हजार ६०० किलो गहू तांदुळाच्या अपहार केला आहे. तर दुकान क्रमांक १४६ च्या मालक कोकीलाबाई वासुदेव माळी यांनी ग्राहक मनकरणाबाई दगडू शेटे मयत असताना त्यांच्या नावे धान्य उचलले. काहींची नावे बीपीएल यादीत नसताना असा १६ लोकांच्या नावे धान्य उचलले, काहींना नियमाप्रमाणे धान्य वाटप केले नाही, असा त्यांनी ७० हजार ६६७ रुपयांचा १८५५ किलो गहू तांदळाचा अंत्योदय योजनेत तर बीपीएल योजनेत ४ लाख ३९ हजार ९९६ रुपये किमतीचा ११ हजार ५२० किलो गहू तांदुळाचा अपहार केला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ही पीठगिरणी तब्बल ९८ वर्षे सुरू, आजही ग्राहकांची पहिली पसंती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



झपाट्याने बदलणाऱ्या आधुनिक जीवनशैलीत पारंपरिक व्यवसाय टिकवणे हे मोठे आव्हान मानले जाते. मात्र पुण्यातील शनिवार पेठेतील मेहुणपुरा परिसरात गेली तब्बल ९८ वर्षे सुरू असलेली राजमाचीकरांची पीठगिरणी आजही आपल्या दर्जेदार सेवेमुळे आणि विश्वासामुळे पुणेकरांच्या मनात विशेष स्थान राखून आहे.ज्वारी, बाजरी, गहू यांसारख्या धान्यांपासून ते मिरची, हळद, मसाले आणि शिकेकाईपर्यंत विविध पदार्थ दळण्यासाठी ही गिरणी प्रसिद्ध आहे. रेडीमेड पिठांच्या वाढत्या वापराच्या काळातही आमची कोठेही शाखा नाही असा फलक लावून ही गिरणी आपली वेगळी ओळख अभिमानाने जपते.

पारंपरिक पद्धती, स्वच्छता आणि ग्राहकांशी जिव्हाळ्याचे नाते हे या गिरणीचे वैशिष्ट्य मानले जाते.राजमाचीकर कुटुंबाचे मूळ कोकणातील भट घराण्यात असून त्यांचा संबंध लोणावळ्याजवळील राजमाची किल्ल्याशी जोडला जातो. पेशव्यांच्या काळात सरदारकी मिळाल्यामुळे भट हे आडनाव बदलून राजमाचीकर झाले. पुढील पिढ्यांनी पुण्यात येत विविध व्यवसाय सुरू केले. स्वदेशी चळवळीच्या काळात त्यांच्या पूर्वजांनी छत्री आणि कुलूप व्यवसाय सुरू केला. त्यानंतर १९२८ च्या सुमारास गिरणी व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली गेली.त्या काळी लोक घरी जात्यावर धान्य दळत असत. मशीनवर दळल्याने कोणताही तोटा होत नाही हे लोकांना पटवून देणे हे मोठे आव्हान होते.

हळूहळू ग्राहकांचा विश्वास वाढत गेला आणि गिरणीचा विस्तार होत गेला. ग्राहकांच्या मागणीनुसार हळद, मिरची, मसाले, चकली भाजणी, उपवासाचे पदार्थ यासाठी स्वतंत्र मशिन्स बसवण्यात आल्या. आज या गिरणीत सुमारे १७ वेगवेगळ्या मशिन्सवर ४० हून अधिक पदार्थ दळले जातात.सध्या या व्यवसायाची चौथी पिढी म्हणजे अजित राजमाचीकर आणि त्यांच्या कुटुंबीयांकडून गिरणीचा कारभार सांभाळला जात आहे. गिरणी हा व्यवसाय रोखीचा असल्यामुळे घरखर्चासाठी मदत व्हावी या उद्देशाने तो सुरू केला होता. सुरुवातीला केवळ १ ते २ पैशांत दळण केले जात होते, अशी माहिती त्यांनी दिली.मार्च ते मे हा गिरणीचा मुख्य हंगाम मानला जातो. यावेळी मोठ्या प्रमाणात ग्राहक दळणासाठी येतात. सध्या गिरणीत ८ ते १० कर्मचारी कार्यरत असून त्यांचा या प्रवासात मोठा वाटा आहे. विशेष म्हणजे, परदेशातील हेरिटेज अभ्यासकही या गिरणीला भेट देण्यासाठी येतात.परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम साधत राजमाचीकरांची गिरणी आजही पुण्याच्या सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग ठरते आहे.

# ₹६५ की दिहाड़ी से एजीएम की कुर्सी तक : प्रतीक्षा टोन्डवलकर की बेमिसाल यात्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

प्रतीक्षा टोंडवलकर की कहानी किसी फिल्मी स्क्रिप्ट से कम नहीं है। वह मुंबई की रहने वाली हैं। भारतीय स्टेट बैंक में कभी उन्होंने सफाईकर्मी के तौर पर काम किया। टॉयलेट और बैंक के फर्नीचर की सफाई की। सिर्फ ६५ रुपये महीने की पगार पर वह ये सभी काम करती थीं। फिर आगे चलकर उसी बैंक में प्रतीक्षा असिस्टेंट जनरल मैनेजर बन गईं। १७ साल की उम्र में शादी। फिर २० साल की उम्र में पति का सिर पर से साया उठ जाने तक, उन्होंने अपनी जिंदगी में बहुत कुछ देखा और सहा है। जिस मुकाम तक प्रतीक्षा आज पहुंची हैं, वह उनकी कड़ी मेहनत और लगन के कारण मुमकिन हुआ। प्रतीक्षा की शादी १७ साल की उम्र में सदाशिव कडू से हो गई थी। माता-पिता की आर्थिक तंगी के कारण वह अपनी १०वीं कक्षा की परीक्षा भी पूरी नहीं कर पाई थीं। सदाशिव मुंबई में एसबीआई में बुकबाइंडर के तौर पर काम करते थे। दुख की बात यह है कि जब यह जोड़ा अपने गांव जा रहा था, तभी एक दुर्घटना में सदाशिव की मौत हो गई। इससे २० साल की उम्र में ही प्रतीक्षा को अपने गुजारे के लिए संघर्ष करना पड़ा।शिक्षा की कमी के कारण प्रतीक्षा के लिए ठीक-ठाक नौकरी खोजना काफी मुश्किल था। परिवार का पेट पालने और अपनी हाई स्कूल की पढ़ाई पूरी करने के लिए उन्हें एसबीआई में सफाईकर्मी के तौर पर काम करने पर मजबूर होना पड़ा। टॉयलेट और बैंक के फर्नीचर की सफाई करके वह महीने के लगभग ६०-६५ रुपये कमाती थीं। साथ ही अपने बेटे की देखभाल करती थीं। यही नहीं, दूसरे छोटे-मोटे काम भी करती थीं। प्रतीक्षा ने दिन-रात एक कर दिया और अपने बेटे का पेट पालने के लिए अपनी क्षमता से कहीं ज्यादा मेहनत की।हर बड़ी उपलब्धि के पीछे संघर्ष और जीत के कई पड़ाव होते हैं। प्रतीक्षा की कहानी भी इससे अलग नहीं थी। मुश्किल समय में जब ऐसा लगता था कि सब कुछ उनके खिलाफ है, तब भी प्रतीक्षा ने कोई शिकायत या रोना-धोना नहीं किया। वह जानती थीं कि जो लोग हार मान लेते हैं और निराशा को हावी होने देते हैं, उन्हें कभी कोई हल नहीं मिलता। ऐसे में बेहतर यही है कि वह खुद ही कोई रास्ता निकालें। उन्होंने पढ़ाई करने का फैसला किया। मुंबई के विक्रोली में एक नाइट कॉलेज में दाखिला लिया। १२वीं की परीक्षा पास की। फिर एक दूसरे नाइट कॉलेज से मनोविज्ञान में ग्रेजुएशन किया। पढ़ाई के क्रम में उन्हें सफाईकर्मी से प्रमोट करके पहले मैसेंजर बनाया गया। जब उन्होंने ग्रेजुएशन पूरा कर लिया तो बैंक में क्लर्क कम कैशियर बना दिया गया।प्रतीक्षा ने साल १९९३ में दूसरी शादी की। उनके पति प्रमोद टोंडवलकर बहुत ही सहयोगी स्वभाव के थे। उन्होंने प्रतीक्षा को बैंक में प्रोमोशन के लिए परीक्षाएं देने के लिए प्रोत्साहित किया। प्रतीक्षा ने हालात का रुख ही बदल दिया। स्थिति में एक बड़ा बदलाव ला दिया। उन्होंने पूरी जान लगाकर काम किया। अपने काम में जबरदस्त प्रदर्शन किया। अपनी लगन और कड़ी मेहनत की बदौलत प्रतीक्षा तरक्की करके 'ट्रेनी ऑफिसर' के पद तक पहुंच गईं। बाद में वह 'डीजीएम' और फिर 'एजीएम' के पद तक पहुंचीं। उनकी सफलता का सफर आज लाखों लोगों को प्रेरित करता है।



# भारताची पेढा राजधानीला शेकडो वर्षांचा इतिहास

## केवळ चवच नाही तर मंदिरांसाठी देखील प्रसिद्ध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील मिठाईच्या नकाशावर उत्तर प्रदेशातील मथुरा शहराला एक वेगळे स्थान आहे. भगवान श्रीकृष्णाची जन्मभूमी असलेले हे शहर केवळ मंदिरांसाठीच नाही, तर तिथल्या अप्रतिम 'पेढ्यां'साठी जगभरात प्रसिद्ध आहे. मथुरेला 'भारताची पेढा राजधानी' म्हणून ओळखले जाते.आज देखील मथुरेच्या पेढ्यांची मोहिनी खवय्यांवर कायम आहे. पेढा आणि मथुरेचे अतूट नाते आहे.मथुरेची ओळख तिथल्या पेढ्याशिवाय अपूर्ण आहे. याला 'प्रसाद' म्हणूनही विशेष महत्त्व आहे.

मथुरेच्या मंदिरांमध्ये येणारा प्रत्येक भक्त आपल्यासोबत पेढ्यांचा डबा नेल्याशिवाय जात नाही. श्रीकृष्णाच्या छप्पन भोगामध्येही पेढ्याला महत्त्वाचे स्थान आहे.

येथील पेढे बनवण्याची कला शतकानुशतके जुनी आहे, जी पिढ्यानपिढ्या जतन केली गेली आहे.इतर शहरांतील पेढ्यांच्या तुलनेत मथुरेचे पेढे वेगळे ठरतात कारण हे पेढे बनवण्यासाठी फुल-फॅट दुधापासून तयार केलेल्या ताज्या खव्याचा वापर केला जातो.



इतर पेढ्यांप्रमाणे हे पेढे जास्त गोड नसतात. यात दूध आणि साखरेचा संतुलित वापर केला जातो, ज्यामुळे दुधाची 'रिच' चव अधिक जाणवते. मथुरेच्या पेढ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते लवकर खराब होत नाहीत, त्यामुळे प्रवासात नेण्यासाठी ते उत्तम पर्याय ठरतात.मथुरेचा पेढा बनवताना खवा लालसर होईपर्यंत सावधपणे भाजला जातो. त्याला योग्य दाटपणा आल्यावर हाताने आकार दिला जातो. यामध्ये वेलचीचा हलका फ्लेवर दिला जातो, जो या पेढ्यांचा सुगंध आणि चव वाढवतो.

मथुरेत अनेक प्रकारच्या पेढ्यांच्या व्हरायटी मिळतात. क्लासिक मथुरा पेढा, केशर पेढा, चॉकलेट पेढा, ड्राय फ्रूट पेढा आणि आता आरोग्यासाठी जागरूक लोकांसाठी 'शुगर-फ्री' पेढेही उपलब्ध आहेत.

'बृजवासी मिठाई वाला' आणि 'राधिका स्वीट्स' यांसारखी जुनी दुकाने मथुरेच्या खऱ्या चवीसाठी जगभर प्रसिद्ध आहेत.पेढ्यांचा व्यवसाय हा मथुरेच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. येथील गल्लोगल्लीत मिठाईची दुकाने पाहायला मिळतात आणि दररोज हजारो किलो पेढ्यांची विक्री होते.

आज देखील, मथुरेच्या रस्त्यावरून चालताना येणारा दूध आणि साखरेचा तो मंद सुगंध पर्यटकांना मिठाईच्या दुकानांकडे खेचून नेतो. जर तुम्ही मथुरा-वृंदावनला जात असाल, तर या 'पेढा राजधानी'ची चव घ्यायला विसरू नका.

# डाळिंब फक्त फळ नव्हे तर औषधी टॉनिक...

## सात व्याधींवर आहे अतिशय गुणकारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डाळिंबाच्या सालीची पेस्ट गुलाबजलासोबत चेहऱ्यावर लावल्यास मुरुमे आणि काळे डाग कमी होऊन त्वचा डिटॉक्स होते. डाळिंबाच्या सालीचे चूर्ण ताक आणि जिऱ्यासोबत घेतल्यास जुलाब आणि आयबीएससारख्या पोटाच्या विकारांत त्वरित आराम मिळतो. दररोज रिकाम्यापोटी १५० ग्रॅम डाळिंबाचे दाणे खाल्ल्याने आंतड्यांमधील जंत नष्ट होण्यास मदत होते.

शरीरातून अंतर्गत रक्तस्त्राव होत असल्यास डाळिंबाची फुले, शेळीचे दूध आणि साखर यांचे मिश्रण अत्यंत प्रभावी ठरते.


मूळव्याधीचा त्रास असलेल्या रुग्णांनी डाळिंबाच्या सालीचे चूर्ण ताकासोबत घेतल्यास सूज कमी होऊन आराम मिळतो. डाळिंबाचा रस 'वीर्यवर्धक' मानला जातो. यातील अँटी-ऑक्सिडंट्समुळे शुक्राणूंची संख्या आणि त्यांची कार्यक्षमता वाढते.

आधुनिक विज्ञानानुसार यातील पॉलीफेनॉल आणि व्हिटॅमिन सी हृदय निरोगी ठेवण्यास आणि पचनशक्ती मजबूत करण्यास मदत करतात. डाळिंबाची साल अँटी-बॅक्टेरियल गुणांनी समृद्ध असल्याने ती त्वचेवरील घातक बॅक्टेरियांचा नाश करते.



# बटाट्याची साल : कचरा की जीवनसत्त्वांचा खजिना?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



बटाटा ही भाजी गृहिणींची सर्वात आवडती भाजी, जगातील कित्येक खाद्य पदार्थ हे बटाट्याशिवाय पूर्ण होत नाहीत.पण बटाटा सालीसहीत खाणे योग्य की साल काढून?तज्ज्ञांच्या मते बटाटा हा कार्बोहाड्रेटने परिपूर्ण भाजी असली तरी खरी पोषक तत्वे दडली आहेत त्याच्या सालीत.बटाट्याच्या सालीमध्ये फायबर, पोटॅशियम, आयर्न आणि व्हिटॅमिन-सी भरपूर प्रमाणात असते. साल काढल्यामुळे ही पोषक तत्वे कमी होतात.सालीमध्ये बटाट्याच्या आतील भागापेक्षा जास्त फायबर असते. हे फायबर पचन सुधारण्यास आणि बद्धकोष्ठतेचा त्रास कमी करण्यास मदत करते.सालीमध्ये असलेल्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम मानले जाते.सालीसकट बटाटा खाल्ल्याने त्यातील फायबरमुळे रक्तातील साखर एकदम वाढत नाही, कारण ते पचायला जास्त वेळ घेते.बटाट्याच्या सालीमध्ये पॉलिफेनॉलसारखे अँटी-ऑक्सिडंट्स असतात, जे शरीरातील पेशींचे नुकसान होण्यापासून संरक्षण करतात.पण बटाटा सालिसहीत खाताना काय काळजी घ्यावी. बटाटा जमिनीत उगवत असल्यामुळे सालीवर माती आणि बॅक्टेरिया असू शकतात.त्यामुळे सालीसकट खाण्यापूर्वी बटाटा कोमट पाण्यात घासून स्वच्छ धुणे आवश्यक आहे.तसेच बटाटा खिसला, कापला तर तो काहीवेळ पाण्यात बुडवून ठेवावा त्यामुळे त्याच्यातील स्टार्च कमी होईल व ते आरोग्यासाठी फायदेशिर ठरेल.जेव्हा तुम्ही बटाटा सालीसकट शिजवता किंवा बेक करता, तेव्हा त्यात तेलाचा वापर कमी होऊन त्याचे पौष्टिक मूल्य टिकून राहते.जर बटाट्याची साल हिरव्या रंगाची दिसत असेल, तर तो भाग अजिबात खाऊ नका. यात सोलानाईन नावाचे विषारी तत्व असू शकते, ज्यामुळे डोकेदुखी किंवा मळमळ होऊ शकते.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५
वर्षांचा समृद्ध
अनुभव
असलेले
शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# शनी जयंती युक्त शनी अमावस्या : आध्यात्मिक व शास्त्रीय महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१६ मे २०२६ अतिशय महत्त्वाचा दिवस या दिवशी शनी अमावस्या आणि शनी जयंती आहे .१६ मे २०२६ रोजी शनी जयंती युक्त अमावस्या आहे. त्यात ही शनी अमावस्या शनी जयंतीला आली आहे. या अमावस्येच्या दिवशी आपण काही उपाय केले म्हणजे आपले पूर्वज, पितर संतोष पावतील ग्रहदोष नष्ट होतात, आरोग्य सुधारते, धनधान्य ची विपुलता होते. एकंदरीत जीवन सुखी समाधानी होण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू होते. शनी जयंती युक्त शनी अमावस्याचे ज्योतिष शास्त्रीय वअध्यात्मिक दृष्ट्या काय महत्त्व आहे. आधी आपण अध्यात्मिक दृष्ट्या शनी जयंती युक्त शनी अमावस्याचे महत्व बघू. या दिवशी कोणकोणत्या धार्मिक क्रिया कराव्यात? ज्यायोगे अध्यात्मिक आणि त्यामुळे आपोआपच भौतिक प्रगती होईल हे आपण आजच्या लेखात बघणार आहोत. भारत देश सुरुवातीपासून अध्यात्माला भौतिक जगापेक्षा अधिक महत्त्व देत आला आहे. त्या पाठीमागे फार सुंदर असे शास्त्रही आहे. ज्या व्यक्तीच्या जीवनात खऱ्या अर्थाने उत्तम अध्यात्म असते त्याचे भौतिक जीवन पण आपोआप सुखी होते.

अध्यात्म म्हणजे केवळ शरीराने नामस्मरण नव्हे किंवा इतर धार्मिक क्रिया नव्हे तर मनापासून आध्यात्म जगायचे असते. प्रत्येक जीवमात्रातच नव्हे तर चराचर सृष्टीत परमेश्वर बघणे म्हणजे अध्यात्म. ज्यावेळी मनुष्याचे एकंदरीत वर्तन पूर्णपणे अध्यात्मिक होऊन जाते त्यावेळी आपोआपच त्याच्या हातून इतरांच्या करिता दुःख देणाऱ्या गोष्टी घडत नाहीत. त्यामुळे त्याच्या वाटणीलाही येणारे दुःख कमी होत जाते. आणि आपोआपच त्याचे भौतिक जग सुद्धा बदलू लागते. अर्थात ही काही महिन्याची प्रोसिजर नाहीये. खूप दीर्घकाळ चालणारी क्रिया आहे. अध्यात्म सलग नित्य जगावे लागते. अध्यात्म बोलण्याची किंवा लेख लिहिण्याची गोष्ट नसून ती एक जगायची पद्धती आहे. असो आपण आता अध्यात्मिक दृष्ट्या शनि जयंतीसह शनी अमावस्या कशी आहे ते बघू. अध्यात्मिक दृष्ट्या शनि जयंतीसह शनी अमावस्याचे महत्व आपार आहे. शनी जयंतीला शनी अमावस्याला मौन मध्ये राहून स्नान दान पितृ कार्य ग्रह दोष निवारणसाठी काही विशेष उपाय करायचे असतात. सर्वप्रथम आपण स्नानबाबत बघू. शनी अमावस्याला यमुना स्नानचे अतिशय महत्त्व सांगितलेले आहे. कारण यमुना नदी ही शनिदेवतेची बहीण आहे तसेच शनीचे सर्वात जागृत स्थान यमुना तठावरती वृंदावन मध्ये कोकीळवन म्हणून आहे तिथे शनीचे सर्वात मोठे स्थान आहे.भगवान श्रीकृष्णांनी वरदान दिलेले आहे की जे लोक वृंदावनला येऊन कोकिळ वना मधल्या शनी देवाचे दर्शन घेतील त्यांचे वृंदावन यात्रा सफल संपूर्ण होईल.सर्वांना यमुना स्नान शक्य होत नाही म्हणून घरच्या आंघोळीच्या पाण्यात यमुना जल थोडेसे ओतले तरी ते यमुना स्नान होते. यमुना जल सुद्धा उपलब्ध नाही त्यांनी स्नान करताना यमुना यमुना असा सलग जप जरी केला तरी यमुना स्नानचे फळ मिळते. तुम्ही घरी बंद बाथरूम मध्ये स्नान करत असाल तरीही स्नान नेहमी कटी वस्त्र नेसूनच करावे म्हणजे कमरेभोवती एक कापड गुंडाळलेले असलेच पाहिजे. जसे तीर्थात अंगाला साबण लावत नाही तसे शनी जयंती युक्त शनी अमावस्या ला अभ्यंग स्नान साबण लावून स्नान करू नये . काही अधिक विशेष फल हवे असल्यास अंगावरच्या संपूर्ण नेसलेल्या कपड्यासह सचैल स्नान करणे याला सुद्धा विशेष महत्त्व आहे. शनी जयंती युक्त शनी अमावस्याला अगदी सूर्योदय होताच मौन मध्ये स्नान करून मौन मध्येच पिंपळ वृक्षची विशेष प्रदक्षिणा करण्याला अपार महत्त्व आहे.



प्रदक्षिणे करता निवडलेला पिंपळ वृक्ष मात्र तुमच्या उंचीच्या किमान दीडपट पाहिजे तसेच त्याचा बुंधाही रुंद असावा. त्यात जर त्या पिंपळाची मुंज झाली असेल तर अधिक उत्तम. पिंपळ वृक्ष मध्ये पण स्त्री पिंपळ आणि पुरुष पिंपळ असतो त्यामुळे पुरुष पिंपळ आहे याचीच खात्री करून मग त्या पिंपळवृक्षाची सेवा करावी. स्त्री पिंपळ वृक्षाला म्हणजे मादा पिंपळ वृक्ष ला हिंदीत पिंपली म्हणतात. स्त्री पिंपळ वृक्ष म्हणजे मादा पिंपळ वृक्ष चा सेवेने फारसे काही मिळत नाही. स्त्री पिंपळवृक्षाचे म्हणजे मादा पिंपळ वृक्षाचे पान आणि त्याच्या फळांवरून आणि उंची आणि रुंदीवरून तो स्त्री पिंपळ म्हणजे मादा पिंपळ आहे हे लक्षात येऊ शकत. सर्वप्रथम पिंपळवृक्षा खाली जाऊन मुळामध्ये गणपती बाप्पाची कल्पना करून त्या गणेशाचे सूक्ष्ममध्येच पंचोपचाराने पूजन करावे. त्यानंतर पिंपळामध्ये ब्रह्मा विष्णू महेश हे असतातच वस्तीला, म्हणून पिंपळ च्या बुंध्याची पूजा करावी. पिंपळ वृक्षाला शुद्ध देशी गाईचे निरसे दूध म्हणजे न तापवलेले दूध अर्पण करावे. त्या दुधात काळे तीळ घालून अर्पण केले तर अधिक उत्तम. त्यानंतर पिंपळ वृक्षाला उजवा हात लावून विष्णु सहस्रनाम किंवा पुरुषसूक्त म्हणत प्रदक्षिणा केल्या त्या ही किमान १०८ तर अतिशय उत्तम.विष्णुसहस्रनाम किंवा पुरुष सूक्त तोंडपाठ नसेल तर किमान ओम नमो भगवते वासुदेवाय हा मंत्र म्हणत तरी किमान १०८ प्रदीक्षना कराव्यात. प्रदक्षिणा करायच्या आधी नर पिंपळवृक्षाची पूजा करून यथाशक्ती यथा संभव पाच प्रकारची मिठाईचे नैवेद्य दाखवावे. एक मोठे डाळिंब घेऊन ते सोलून त्याचे सगळे दाणे ठेवावेत.प्रदक्षिणा पूर्ण होईपर्यंत अखंड दीप तोही गाईचा तुपाचा अखंड दीप चालू राहील याची काळजी घ्यावी. या प्रदक्षिणाने तुमची अनेक अडलेली महत्त्वाची कामे मार्गी लागतील अशी खात्री देतो. या पद्धतीने च्या दरम्यान जर तुम्ही आपल्या उंचीच्या एवढे लांबी चे कच्चेसूत जर नर पिंपळाला लपेटले तर ते अधिक उत्तम त्याने तुमच्या आरोग्याच्या समस्या अगदी कमी होऊन जातात. वटपौर्णिमेला स्त्रिया याच कारणाने वटवृक्षाला आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी कच्चे सुत लपेटतात. ज्यांना प्रत्यक्ष यमुने वरती स्नानाला जाणे शक्य नाही त्या लोकांनी अगदी मनापासून कल्पना करावी की आपण मानसिक यमुना मंत्र जप करून मौन मध्ये यमुना स्नान केले आहे. त्या नंतर मौन मध्येच पिंपळवृक्षा खाली जाऊन पिंपळ वृक्षाला आपली व्यथा सांगुन पूजा करायची आहे . त्यानंतर पिंपळ वृक्षाला विविध प्रकारच्या मिठाई अर्पण करायचा आहेत. तसेच आपल्या पूर्वज लोकाचाच्या प्रीत्यर्थ सकाळीच पिंपळ वृक्षाला भाताचे लाडू तुपात बांधून अर्पण करायचे आहेत. जसे पिंड तयार करतो त्याप्रमाणे भाताचे पिंड तयार करून पिंपळावरती राहणाऱ्या कावळ्यांकरता ते खऱ्या अर्थाने पिंपळ वृक्षाच्या खाली अर्पण करायचे आहेत. त्यानंतर पिंपल वृक्षाला प्रदक्षिणा करायचा आहेत. दुपारी घरी येऊन बाराच्या सुमारास बिन मिठाचा भात वेगळा शिजावून गच्चीच्या दक्षिण भागात पत्राळीवरती चार भाग करून त्या चारी भागावर थोडे थोडे दही काळे तीळ, काळे उडीद हे टाकून स्वतः चा आई आणि वडील घराण्या चा पितरांना घरातील सर्वांनीच आदराने नमस्कार करून प्रार्थना करायची आहे की त्यांनी या दहीभाताच्या नैवेद्याने प्रसन्न व्हावे. शनिवारी शनी जयंती अमावस्या म्हणून स्नान होताच पितृ तर्पण पण अतिशय आवश्यक आहे. पितृगणाचा वास हा चंद्रलोक किंवा चंद्रलोकच्याही वरती असतो असे म्हणतात म्हणून शक्य असेल तर दान मध्ये चांदीच्या वस्तू दिल्या जाव्यात. पितरांना यामुळे खूप संतोष होतो आणि तुमचा चंद्र दोष फार वेगाने जातो. पितरचे दान शक्य असेल तर पिंपळवृक्षा खालीच करावे. पितृगणानिमित्त गरजू व्यक्तींना श्वेतवस्त्र सुद्धा दान करता येतात.

मि तर म्हणतो की श्वेत वस्त्र म्हणजे पांढरे कपडे जरूर द्याव. पिंपळवृक्षा खाली केलेल्या जपला स्नानला ,दानला अत्याधिक महत्त्व आहे त्यात जर का जर शनी अमावस्या असेल त्यातही शनी जयंती असेल तर अतिशय पुण्यप्रद काम आहे आणि त्यातही जर नदीकाठी पिंपळ असेल आणि ती नदी बारामाही वाहणारी असेल तर त्या मौन स्नान, दान , जप ची महिमा काय वरणावी. श्री गुरुचरित्र ग्रंथात प्रत्यक्ष दत्तप्रभूंनी पिंपळसेवेचे किती महत्त्व वर्णन केले आहे हे अगदी मुळापासून वाचण्यासारखे आहे आणि गाणगापूर असो वाडी असो तिथे नदीकाठी पिंपळवृक्ष आहेतच आणि तिथे दत्तप्रभू पण आहेत. शनी जयंती अमावस्याला पिंपल वृक्षाचे रोपण म्हणजे पिंपल वृक्ष लावला तर अधिक फलदायी आहे. पिंपळ वृक्ष ची सेवा ही कधीही सूर्योदय पासून मध्यान पर्यंत करावी म्हणजे भर दुपारी बारा पर्यंतच करावी. बारा ते तीन पर्यंत चुकूनही पिंपळ वृक्षाच्या खाली जाऊ नये किंवा त्याची पूजा करू नये त्यावेळी तिथे अलक्ष्मीचा वास असतो. दुपारी तीन नंतर परत सूर्यास्त पर्यंत पिंपळ वृक्षाची सेवा करू शकता. दुपारी ३.३० ते सूर्यास्त पर्यंतच प्रदक्षिणा सेवा करावी. तसेच रविवारी चुकूनही पिंपळसेवा करू नये मंगळवारी संक्रांत असताना पिंपळसेवा करू नये. सायंकाळी पिंपळवृक्षाखाली अवश्य दिवा लावावा. त्या दिव्याची वात जर लाल कापडाची ठेवली आणि त्यात जर थोडेसे केसर टाकले तर महालक्ष्मीची अपार कृपा प्राप्त होते. माता महालक्ष्मी पिंपळसेवेने प्रसन्न होत असते. कारण पिंपळ म्हणजे भगवान विष्णूचे स्वरूप आहे आणि माता महालक्ष्मी ही महान पतिव्रता असल्यामुळे विष्णू सेवेमुळे अधिक प्रसन्न होते. लक्षात ठेवा केवळ लक्ष्मी उपासना जेवढे फळ देत नाही तेवढे उत्तम फळ लक्ष्मी नारायण उपासना देत असते. त्या सेवेने आलेले लक्ष्मी चिरकाल स्थिर असते. एकट्या लक्ष्मी ची उपासना केवळ तांत्रिक लक्ष्मी उपासना मध्ये होते आणि ती लक्ष्मी चिर काळ पिढ्यान् पिढ्या राहणारी नसते. शनि जयंती युक्त शनी अमावस्याचा संपूर्ण दिवस अशा रीतीने तुम्ही मौन मध्ये स्नान करून मौन मध्येच पिंपळसेवा करून मौन मध्येच गरजू लोकांना चांदीचे दान ,वस्त्रदान ,अन्नदान करून खूप मोठे पुण्य मिळवू शकता. पिंपळा खाली केलेले स्नान गंगास्नान एवढे पुण्यप्रद असते पिंपळवृक्षाखाली दिलेले एक व्यक्तीला दिलेले भोजन अनेक व्यक्तींना जेवण घालण्याएवढे पुण्यपद असते. केवळ मानवसेवाच पिंपळा खाली करू नये तर भाताचे पिंड तूप लावून तयार करून ते पिंपळा वरती बसणाऱ्या पक्षी करता ठेवावेत. तसेच मुंग्यांकरता पिठात साखर मिसळून तेही टाकावे म्हणजे मुंग्यांना सुद्धा खाद्य मिळेल आणि मुंगी सगळ्यात दुर्बल प्राणी असल्याने तिच्या केलेल्या सेवेने तो सर्वशक्तिमान अधिक प्रसन्न होतो. १६ मे २०२६ ची शनी जयंती युक्त शनी अमावस्या ही मुख्यतः ग्रहराज शुक्र यांच्या भरणी नक्षत्रात होत आहे . तसेच ग्रहसेनापती मंगळ याच्या मेष राशीत सुरू होऊन दैत्य गुरू शुक्र चा स्व नक्षत्रात म्हणजे भरणी नक्षत्रात होत आहे.

सूर्य आत्मकारक,चंद्र मनाचा कारक, मंगळ पराक्रमाचा कारक,शुक्र हाच सर्वाधिक सुख उपभोग देणारा ग्रह, त्याच दिवशी कर्मफल दाता शनि जयंती या सर्व ग्रहांचे अंतर संबंध आणि आपल्या नित्यनैमित्तिक जीवना सोबत असणारे संबंध बघताही शनि जयंती शनी अमावस्या खूप विशेष आहे.सर्वांना माहीत असेलच शनीचा त्रासातून मुक्तता सगळ्यात लवकर पिंपळसेवेमुळे मिळते. तेव्हा सध्या अशा परिस्थितीत पिंपळसेवा व तीही वर दिलेल्या प्रमाणे अधिकाधिक स्वरूपात केली तर अधिक उत्तम. १६ मे २०२६ रोजी संध्याकाळी सूर्य अस्त नंतर पिंपळ वृक्षा खाली दिवा लावावा मोहरीच्या तेलाचा आणि त्यानंतर शनिप्रत्यर्थ तळलेल्या खाद्यपदार्थ चे दान वृद्ध अपंग लोकांना करावे. शनि मंत्राचा जप करावा. त्यायोगे शनी चा साडेसाती पासून लवकर सुटका होईल. लक्षात ठेवा शनीचे उपाय नेहमीच सूर्यास्त नंतर दोन तासाच्या आतच करायचे असतात सूर्य आकाशात असताना उपाय करू नयेत नीलम पण शनिवारी सूर्यास्त नंतर शनीच्या होऱ्यामध्ये धारण करावा. अमावस्या तिथीचे देवता पितर शनिवार चा देवता शनी त्रिपाद भरणी नक्षत्र चे ग्रह स्वामी शुक्र राशी स्वामी मंगळ असे असूनही सर्वाधिक प्रसन्नता शनीची होणार आहे.आहे ना गंमत तसेच शनी अमावस्याला जर शिवलिंगा वरती शिव पूजन करून चांदीचे नाग आणि नागिन अर्पण केले तर काळसर्प दोषापासून मुक्तता मिळण्यास मदत होते. म्हणजेच राहू केतूच्या त्रासापासून मुक्तता होते. बघा वाचक हो तिथी वार नक्षत्र चा संयोग मुळे किती ग्रह एकाच वेळी प्रसन्न होत आहेत. तसेच आध्यात्मिक दृष्ट्या बघितले तर तुम्ही निसर्गाची पूजा करता. तुम्ही २४ तास ऑक्सिजन देणारे वृक्षाच्या संगतीत अधिकात अधिक काळ राहून तुमच्या शरीरातील ऑक्सिजन वाढवून तुम्ही तुमच्या आरोग्यत सुधारणा करून घेता. तुम्ही निसर्गातील दुर्बल प्राणी घटकांचा करता अन्नधान्याची सोय करता त्यांची दुवा मिळवता. वाचक हो अध्यात्म हेच असते इतरांचा विचार करणे इतरांच्या सुख सोयीचा विचार करणे स्वतःला थोडे बहुत कष्ट झाले तरी हरकत नाही हे विचारसरणी असणे म्हणजेच अध्यात्मिक असणे. अध्यात्मिक जीवन जगले की आपोआपच तुमचे शारीरिक व मानसिक आरोग्यही सुधारते. उत्तम शारीरिक व मानसिक आरोग्य मुळे अचूक निर्णय क्षमता येऊन हाती घेतलेल्या कामांमध्ये यश मिळते. यासाठी मी म्हणत होतो की आध्यात्मिक आणि भौतिक जीवन खरे बघितले तर एकमेकाला पूरकच आहेत.

## शनिदेवांसमोर हात जोडून नमस्कार का करू नये?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज शनि जयंती साजरी होणार आहे. लाखो भक्त शनिदेवाची पूजा करणार आहेत. पण ज्योतिषशास्त्रानुसार शनिदेवांची पूजा करताना काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे खूप गरजेचे आहे. चुकीच्या पद्धतीने पूजा केल्यास उलट नुकसान होऊ शकते.

**हात जोडून नमस्कार का करू नये?**

शनिदेव न्यायाचे देवता आहेत. ते न्यायाधीशासारखे कर्माचे फळ देतात. न्यायालयात न्यायाधीशांना हात जोडून नमस्कार करत नाही, त्यांच्यासमोर डोके झुकवून आणि हात मागे ठेवून अभिवादन करतो. तसेच शनिदेवांना हात जोडू नका. असे केल्याने नकारात्मक प्रभाव पडू शकतो.

**मूर्तीसमोर थेट उभे राहू नका?**

शनिदेवांची नजर खूप तीव्र आणि क्रूर मानली जाते. त्यामुळे त्यांच्या मूर्तीसमोर कधीही थेट उभे राहू नका. नेहमी मूर्तीच्या उजव्या किंवा डाव्या बाजूला उभे राहा. यामुळे त्यांच्या नजरेचा थेट परिणाम टाळता येतो आणि जीवनातील अडचणी कमी होतात.

**अडचणींत पूजा करताना सावध रहा**

साडेसाती किंवा दशा चालू असताना लोक मंदिरात जाऊन शनिदेवाला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतात. पण या वेळी छोट्या चुका होऊ शकतात. त्यामुळे शुभ फळ मिळण्याऐवजी अडचणी वाढू शकतात. म्हणून पूजेच्या नियमांचे काटेकोर पालन करा.

**गरिबांचा अपमान आणि अप्रामाणिकपणा टाळा**

शनिदेवांना गरिबांचा अपमान आणि खोटेपणा अजिबात आवडत नाही. प्रामाणिक राहा, दिलेला शब्द पाळा. प्रामाणिक व्यक्तीला शनिदेव राजासारखे सन्मान देतात, तर खोट्या व्यक्तीला कठीण शिक्षा देतात.

**शनि जयंतीला पूजेची योग्य पद्धत**


शनिवारी सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर पूजा करा. स्वच्छ काळे किंवा निळे कपडे घाला. मूर्ती पश्चिम दिशेला तोंड करून ठेवा. मोहरीच्या तेलाचा दिवा लावा. काळे तीळ, निळी फुले, शमीची पाने आणि मोहरीचे तेल अर्पण करा. प्रसाद म्हणून काळी उडीद किंवा खिचडी द्या.



## जीवन मुक्तीचा त्रिसूत्री मार्ग : देह, मन आणि आत्म्याचे समर्पण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मानवी जीवन हे शरीर, मन आणि आत्मा यांचे मिश्रण आहे. या तिन्हींचे व्यवस्थापन योग्य प्रकारे कसे करावे, जेणेकरून जीवनात तात्काळ समाधान प्राप्त होईल, याचे मार्गदर्शन खालील मुद्द्यांतून मिळते.



**१. शरीराचे समर्पण : प्रारब्धाचा स्वीकार**

माणसाने आपल्या शरीराला प्रारब्धाच्या हवाली करावे. जीवनाच्या प्रवासात ओघाने जी काही सुख-दुःखे येतील, ती भगवंताचा प्रसाद मानून बिनतक्रार सहन करावीत. देहाच्या कर्माचे ओझे प्रारब्धावर सोपवणे हाच शारीरिक शांतीचा मार्ग आहे.

**२. मनाचे नियोजन : नामस्मरणाची टोचणी**

मनाचा मूळ धर्म संकल्प-विकल्प करणे हा आहे. मनाला स्थिर करण्यासाठी त्याला भगवंताच्या नामात गुंतवणे आवश्यक आहे. "जे काही घडत आहे, ते ईश्वरी इच्छेनेच घडत आहे," ही ठाम श्रद्धा निर्माण होण्यासाठी मनाला सतत नामाची जोड असणे गरजेचे आहे.

**३. आत्म्याचे अनुसंधान : अकर्तेपणाची भावना**

खरा मालक किंवा कर्ता-करविता हा परमात्माच आहे. 'मी कर्ता नाही' हे ओळखून, आपला आत्मा हा भगवंताचाच अंश आहे, असे सतत अनुसंधान ठेवावे. आपले कर्तेपण ईश्वराच्या चरणी अर्पण केल्याने अहंकाराचा नाश होतो.

**कृतीतून समाधानाचा मार्ग**

ज्या क्षणी माणूस 'मी भगवंताचा आहे' या जाणिवेने नामात राहतो आणि देह प्रारब्धावर सोपवतो, त्याला तात्काळ खरे समाधान मिळते. आपल्या आड येणाऱ्या इच्छांना दूर सारण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. त्यामुळे अधिक चिकित्सा किंवा शंका न घेता, थेट साधनेच्या कृतीला आरंभ करणे श्रेयस्कर ठरते.

## तब्बल १३ वर्षांनी आला योग!

### १६ मे रोजी शनी जयंती; काही राशींना दुर्मिळ सुख मिळून शनी देवाची कृपा होणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माणसाच्या कर्मांचा हिशेब कधी ना कधी होतच असतो, असे म्हटले जाते. चांगले किंवा वाईट कर्म असो, त्याचे फळ प्रत्येकाला भोगावे लागते. ज्योतिषशास्त्रानुसार शनी देव हे कर्म आणि न्यायाचे देव मानले जातात. व्यक्तीच्या कर्मानुसार ते फळ देतात. त्यामुळे शनीचा शुभ प्रभाव असेल तर आयुष्यात सकारात्मक बदल घडू लागतात, तर अशुभ प्रभावामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

याच पार्श्वभूमीवर २०२६ मधील शनी जयंती विशेष महत्त्वाची मानली जात आहे. तब्बल १३ वर्षांनंतर तयार होत असलेला दुर्मिळ योग काही राशींसाठी लाभदायक संकेत देत आहे. करिअर, आर्थिक स्थिती आणि वैयक्तिक आयुष्यात सकारात्मक बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**२०२६ ची शनी जयंती का आहे खास?**

वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार २०२६ मधील शनी जयंती शनिवार, दि. १६ मे रोजी येत आहे. शनी जयंती आणि शनिवार यांचा एकत्र योग अत्यंत प्रभावशाली मानला जातो. अशा योगामुळे शनिदेवांचा प्रभाव अधिक वाढतो, असे मानले जाते.

जवळपास १३ वर्षांनंतर असा योग जुळून आल्याने काही राशींसाठी हा काळ प्रगती, दिलासा आणि नवीन संधी घेऊन येऊ शकतो. विशेषतः ५ राशींना करिअर, आर्थिक लाभ आणि कौटुंबिक सुखाच्या बाबतीत चांगले परिणाम दिसून येण्याची शक्यता आहे.



**वृषभ :** ज्योतिषशास्त्रानुसार वृषभ राशीच्या लोकांसाठी हा काळ सकारात्मक ठरू शकतो. बऱ्याच दिवसांपासून पदोन्नती किंवा नवीन नोकरीची वाट पाहणाऱ्यांना आनंदाची बातमी मिळू शकते. कामाच्या ठिकाणी सुरू असलेला तणाव कमी होण्याची शक्यता आहे. दीर्घकाळ केलेल्या मेहनतीचे फळ आता मिळू शकते.

**मिथुन :** या राशीच्या लोकांसाठी हा काळ हळूहळू सुधारणा घेऊन येऊ शकतो. व्यवसायात फायदा होण्याची शक्यता असून, रखडलेली कामे पूर्ण होऊ शकतात. काही लोक नवीन योजना किंवा कामाची सुरुवात करू शकतात, ज्याचा भविष्यात चांगला फायदा होण्याचे संकेत आहेत.

**तूळ :** या राशीच्या लोकांसाठी शनी जयंती नवीन संधी घेऊन येऊ शकते. करिअरमध्ये बदल किंवा नवीन जबाबदाऱ्या मिळण्याची शक्यता आहे. काहींना परदेश प्रवासाशी संबंधित संधी मिळू शकतात. कुटुंबातील वातावरणही पूर्वीपेक्षा अधिक आनंदी आणि शांत राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**धनू :** या राशीच्या लोकांसाठी हा काळ अनुकूल ठरू शकतो. कामाच्या ठिकाणी वरिष्ठ आणि सहकाऱ्यांकडून चांगला पाठिंबा मिळू शकतो. दीर्घकाळ एखाद्या प्रकल्पावर मेहनत घेणाऱ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थितीतही सुधारणा दिसून येऊ शकते.

**कुंभ :** ज्योतिषशास्त्रानुसार शनी देव कुंभ राशीचे स्वामी मानले जातात. त्यामुळे या राशीवर शनी जयंतीचा प्रभाव अधिक राहू शकतो. साडेसाती किंवा धैय्यामुळे त्रस्त असलेल्यांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे. करिअरमध्ये नवीन उंची गाठण्याच्या संधी मिळू शकतात. तसेच जीवनात स्थिरता आणि सकारात्मक बदल अनुभवायला मिळू शकतात.

## कोंबडा आणि कावळ्याकडून शिका 'या' गोष्टी

### आयुष्यात नक्की व्हाल यशस्वी, सगळीकडेच असेल तुमची चर्चा...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चाणक्यांचा सुविचार आपल्याला चाणक्य नीतीतील त्या खोल गोष्टींची आठवण करून देतो. ज्या रोजच्या जीवनात यश मिळवण्याचा मार्ग दाखवितात. आचार्य चाणक्य सांगतात, की आपल्याला निसर्गातील प्राण्यांकडूनही शिकायला हवे. कोंबडा आणि कावळा हे दोन साधे प्राणी आपल्याला ९ अशा सवयी शिकवतात, की ज्या अंगीकारणारा माणूस आयुष्यात कधी मागे राहत नाही.

चाणक्य नीतीच्या ६ व्या अध्यायातील १८ वा आणि १९ वा श्लोकात याचा उल्लेख आहे.

**'प्रत्युत्थानं च युद्धं च संविभागं च बन्धुषु ।**
**स्वयमाक्रम्य भुक्तं च शिक्षेच्चत्वारि कुक्कुटात् ॥'**
**'गूढमैथुनचारित्वं काले काले च सङ्ग्रहम् ।**
**अप्रमत्तमविश्वासं पञ्च शिक्षेच्च वायसात् ॥'**

**पहिली :** सूर्योदयाच्या आधी उठणे. जो माणूस लवकर उठतो त्याच्याकडे वेळ आणि ऊर्जा दोन्ही जास्त असतात.
**दुसरी :** लढाईसाठी नेहमी तयार राहणे. कोंबडा धोका ओळखतो आणि तयार राहतो.
**तिसरी :** कुटुंब आणि आपल्या लोकांबरोबर वाटून घेणे.
**चौथी :** मेहनत करून स्वतः कमावणे. कोंबडा इतरांवर अवलंबून राहत नाही, तो स्वतः अन्न शोधून खातो.

**कावळ्याकडून शिकण्याच्या ५ सवयी**


कावळ्याकडून ५ महत्त्वाच्या गोष्टी शिकायला हव्यात.
**पहिली :** आपल्या खासगी गोष्टी लपवून ठेवणे.
**दुसरी :** वेळोवेळी साठवण करणे. कावळा गरजेच्या वेळी अन्न साठवून ठेवतो.
**तिसरी :** नेहमी सावध आणि सतर्क राहणे.
**चौथी :** विचार न करता कोणावरही विश्वास ठेवू नये.
**पाचवी :** संधीचा योग्य फायदा घेणे.
या सवयी माणसाला हुशार, सावध आणि सुरक्षित ठेवतात.

**या सवयींमुळे यश कसे मिळते?**

जेव्हा एखादा माणूस कोंबडा आणि कावळ्याच्या या ९ सवयी आपल्या जीवनात आणतो, तेव्हा त्याच्या प्रगतीला कोणतीही अडचण येत नाही. तो वेळेवर उठतो, मेहनत करतो, सतर्क राहतो आणि गरज पडल्यास लढायला तयार असतो. आचार्य चाणक्य यांच्या मते अशा माणसाला नोकरी, व्यवसाय किंवा आयुष्यातील कोणत्याही क्षेत्रात यश मिळते. तो इतरांवर अवलंबून राहत नाही आणि स्वतःचे नशीब स्वतः घडवतो.

**आधुनिक जीवनात चाणक्यांची उपयुक्तता**

आजकाल बरेच लोक उशिरा उठतात, इतरांवर अवलंबून राहतात आणि पटकन कोणावरही विश्वास ठेवतात. चाणक्य आपल्याला शिकवतात की या दोन प्राण्यांकडून शिकून आपण आपली प्रगती कोणीही थांबवू शकत नाही. लवकर उठून नियोजन करणे, सतर्क राहणे आणि मेहनतीने पुढे जाणे - या छोट्या सवयी मोठे परिणाम देतात.



चाणक्य नीतीचा हा सुविचार आपल्याला सांगतो की यश कोणत्याही जादूने मिळत नाही, तर योग्य सवयींमुळे मिळते. कोंबडा आणि कावळ्यासारख्या या साध्या सवयी अंगीकारून तुम्ही आयुष्यात नवीन उंची गाठू शकता.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)